# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
ईपीबीएक्स : २६५९०००१-०८ / २६५९ ४००० फॅक्स : २६५९१२६४
ई-मेलः mmrda@giasbm01.vsnl.net.in वेबसाईट : http://www.mmrdamumbai.org

## निविदा सूचना

## राष्ट्रीय स्पर्धात्मक बोली

मुंबई शहर, उपनगर व महानगर प्रदेशामधील रस्त्यांवर बांधण्यात आलेल्या विविध आकाशमार्गिकांवर पाच वर्षाच्या कालावधीकरीता जाहिराती झळकवण्यासाठी, इच्छुक निविदाकारांकडून ठोक रक्कम पद्धतीने (Lumpsum) मोहोरबंद देकार मागविण्यात येत आहेत. जाहिराती झळकवण्याच्या आकाशमार्गिकांच्या स्थानांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उप अ.क्र. | कामाचे नाव | जाहिरातीचे अंदाजित क्षेत्रफळ (चौ.मी) | इसा-याची रक्कम (रु.लाखात) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | अ) | **वांद्रे (पूर्व)** रेल्वे पादचारी पुल ते कलानगर आणि वांद्रे कोर्ट. | ११७२७.९१ | १४४ | ०५ वर्ष |
| | ब) | **वांद्रे (प)** रेल्वे पादचारी पुल ते लकी रेस्टॉरंट तलाव आणि बडी मस्जीद. | | | |
| २. | अ) | **सांताक्रुझ (पूर्व)** रेल्वे पादचारी पुल ते पश्चिम द्रूतगती मार्ग पादचारी पुल. | ३००८.१ | १७०.०० | ०५ वर्ष |
| | ब) | **सांताक्रुझ (प)** रेल्वे पादचारी पुल ते के.के.रोड मार्गे एस.व्ही रोड. | | | |
| ३. | अ) | **अंधेरी (पूर्व)** रेल्वे पादचारी पुल ते गोखले पुल | २८४०.१२ | १५०.०० | ०५ वर्ष |
| | ब) | **विलेपार्ले (प)** रेल्वे पादचारी पुल ते एस.व्ही रोड | | | |
| ४. | अ) | **बोरिवली (प)** तेजप्रकाश इमारत, सबवे जवळील रेल्वे फलाट क्र.- ७ ते दत्तपाडा रोडवरील एस.व्ही. रोड जंक्शन, एस.व्ही रोड वरील आईसलॅन्ड जवळ गोरागांधी इमारत ते दत्तपाडा रोड जंक्शन, चंद्रावरकर मार्गावरील साई निकेतन इमारत ते कॉसमॉस बॅक | ७०५५.२८ | २६०.०० | ०५ वर्ष |
| | ब) | **गोरेगाव (प)** रेल्वे पादचारी पुल ते एस.व्ही रोड | | | |
| | क) | **कांदीवली (पूर्व)** रेल्वे पादचारी पुल ते पश्चिम द्रूतगती मार्ग. | | | |
| ५. | अ) | **ग्रॅान्ट रोड** रेल्वे पादचारी पुल ते नाना चौक | १७८३.६ | २५०.०० | ०५ वर्ष |
| ६. | अ) | **दहिसर (पूर्व)** रेल्वे पादचारी पुल ते बारुचा रोड मार्गे एस.व्ही रोड. | ५०७३.७८ | १२०.०० | ०५ वर्ष |
| | ब) | **दहिसर (प)** रेल्वे पादचारी पुल ते एल.टी रोड / विठ्ठल मंदीर. | | | |
| | क) | **मिरा रोड (पुर्व)** सय्यद हमीद चौक ते विरारच्या दिशेकडील रेल्वे पादचारी पुल, मिरा रोड टपाल कार्यालय ते विरारच्या दिशेकडील रेल्वे पादचारी पुल, गावदेवीनगर झोपडपट्टी ते सुभिक्षा सुपरमार्केट. | | | |
| ७. | अ) | **भांडूप (पश्चिम)** रेल्वे पादचारी पुल ते लाल बहाद्दूर शास्त्री रोड. | २४२९.५२ | ६०.०० | ०५ वर्ष |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ब) | **घाटकोपर (पश्चिम)** रतन महाल हॉटेल ते निओ हॉटेल, निओ हॉटेल ते झुनझुनवाला कॉलेजजवळील बृहन्मुंबई महानगरपालिकेचा पादचारी पुल. | | | |
| ८. | अ) | **चेंबूर** रेल्वे पादचारी पुल ते पश्चिमेकडील टपाल कार्यालय आणि पुर्वेकडील पोलिस स्टेशनपर्यंत. | ६८७.२८ | १०.०० | ०५ वर्ष |
| ९. | अ) | **उल्हासनगर (पश्चिम)** रेल्वे पादचारी पुल ते, साकव (Submersible Bridge), लक्ष्मी नारायण इमारत, चांदीबाई महाविद्यालय, गुरुद्वारा. | २००३.७६ | ३०.०० | ०५ वर्ष |
| १०. | अ) | **विरार (पश्चिम)** रेल्वे पादचारी पुल ते शिवाजी महाराजांच्या पुतळयापर्यंत. | २९१३.६८ | २५.०० | ०५ वर्ष |
| | ब) | **वसई रोड (पश्चिम)** अभियांत्रिकी महाविद्यालय बस स्थानक ते बाजारहाट क्षेत्र. | | | |
| ११. | अ) | **बदलापूर (पूर्व)** रेल्वे पादचारी पुल ते रिक्षा स्थानक, नवरत्न हॉटेल. | १९४३.२६ | २०.०० | ०५ वर्ष |
| | ब) | **बदलापूर (पश्चिम)** रेल्वे पादचारी पुल ते पोलिस चौकी, बस स्थानक. | | | |
| १२. | अ) | **कल्याण (पश्चिम)** शिवाजी चौक, अग्नीशामक केंद्राजवळ मुरबाड रोड. | ३६३२.४२ | ७०.०० | ०५ वर्ष |
| १३. | अ) | **कांजूरमार्ग** रेल्वे पादचारी पुल ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पु व पु वसाहत. | १२६६.१५ | ५.०० | ०५ वर्ष |

१. प्रत्येक अ.क्र समोरील कामाची स्वतंत्र निविदा भरावी मात्र सदर अनुक्रमांका समोरील उप क्रमांकाच्या कामाची निविदा एकत्रितपणे भरावी.

२. जाहिरातीच्या फलकाचे दर्शविलेले क्षेत्रफळ अंदाजे असुन ±१०% पर्यंत क्षेत्रफळामध्ये फरक झाल्यास देकाराच्या रक्कमांमध्ये अधिक्य किंवा वजावट करण्यात येणार नाही. मात्र सदर तफावत ±१०% पेक्षा जास्त झाल्यास त्या त्या प्रमाणात (Prorata basis) तशा परिस्थितीप्रमाणे देकाराच्या रक्कमेध्ये अधिक्य किंवा वजावट करण्यात येईल.

**पात्रता निकषः-**

१) खालील निकषांची पूर्तता करणारे निविदाकार, देकार सादर करण्यासाठी पात्र असतील. संयुक्त करारनाम्यांना (जॉइंट व्हेंचर) मान्यता नाही.

अ) भारतीय कंत्राट, बाहय (Outdoor) जाहिरात करण्याच्या कामाच्या क्षेत्रात कमीत कमी ३ वर्षापासून कार्यरत असणे आवश्यक असुन देखभाली सह/रहित पादचारी पुल, बस निवारा स्थानक, आकाशमार्गिका, रेल्वे टर्मिनस / बस स्थानक, सार्वजनिक बगिचा इ. ठिकाणी पुरेशा सुख सोई, प्रकाश व्यवस्था, सार्वजनिक माहिती प्रसार इ. कामांचा समावेश असलेला आणि ३ वर्षापेक्षा कमी कालावधी नसेल असा भारतामध्ये अथवा भारता बाहेर अनुभव असावा.

ब) ३१ मार्च २००९ रोजी संपलेल्या मागील ३ वर्षामधील वार्षिक उलाढाल सरासरी रु. ५.०० करोड इतक्या मुल्यांपर्यंत असावयास हवी.

क) ३१ मार्च २००९ रोजी संपणा-या मागील ५ वर्षामधील कोणत्याही दोन वर्षामध्ये तोटा झालेला नसावा.

ड) रु. ३.०० करोड इतक्या रक्कमेची पतदारी (Solvancy) असावी.

३. **निवडीचे निकष:**

सर्व अटींची पुर्तता करणा-या व जास्तीत जास्त रकमेचा देकार सादर करणा-या निविदाकाराची निवड करण्यात येईल.

४. जाहिरातींची सुची, अटी व शर्तिचा संच असलेला व यशस्वी निविदाकाराशी करावयाचा असलेला करारनामा व इतर बाबी समाविष्ट असलेले निविदा प्रपत्र, रु. १०,०००/- (नापरतावा) "एम.एम.आर.डी फंड" च्या नावे असलेल्या दर्शनी हुंडी (डिमांड ड्राफ्ट) आणि आयकर पॅन, वॅट नोंदणी आणि उपरोक्त उलेख्खिलेल्या कागदपत्रांची सक्षम अधिका-यांची स्वाक्षरी असलेल्या सत्यप्रती सादर केल्यानंतर (सोबत मुळप्रती पडताळणीसाठी) अदा करण्यात येतील. सदर प्रपत्र दि. २३/१२/२००९ ते २९/०१/२०१० या कालावधीमध्ये शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटटया वगळता स. ११.०० ते दु. ४.०० या वेळेमध्ये उपलब्ध करण्यात येतील.

५. एम.एम.आर.डी फंडाच्या मुंबई येथे रोखीयोग्य असलेली दर्शनी हुंडी (डिमांड ड्राफ्ट) रुपामध्ये इसा-याची रक्कम मोहोरबंद देकाराबरोकर असली पाहीजे.

६. विहित केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती, इसा-याची रक्कम आणि आर्थिक देकार हे त्याचा स्वयंस्पष्ट उल्लेख दर्शनी भागावर करुन स्वतंत्रपणे दोन लिफाफ्यामध्ये मोहोरबंद करावेत. सदर स्वतंत्र दोन मोहोरबंद लिफाफे एकत्रितपणे एका समान लिफाफ्यामध्ये मोहोरबंद करुन, दि. ५/०२/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत, अति. मुख्य अभियंता अभियांत्रिकी विभाग, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांच्या कार्यालयात स्विकारण्यात येतील. शक्य असल्यास, पात्रताविषयीच्या कागदपत्रांच्या सत्य प्रती, इसा-याची रक्कम असलेला लिफाफा मुख्य अभियंता यांच्या प्राधिकृत केलेल्या सक्षम प्रतिनिधी द्वारे त्याचदिवशी दुपारी ३.३० वाजता उघडण्यात येतील. सिलबंद आर्थिक देकारांचा दुसरा लिफाफा उघडण्याची तारीख व वेळ नंतर कळविण्यात येईल.

७. दि. १८/०१/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता निविदाकारांच्या, कामासंबधी काही शंका असल्यास, त्यांचे निरसन करण्यासाठी पुर्व-निविदा बैठक, मा.महानगर आयुक्त मुं.म.प्र.वि.प्रा, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पु) मुंबई- ५१ यांच्या दालनामध्ये आयोजित करण्यात येईल.

८. कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय रद्द करणेचा अधिकार प्राधिकरणाने राखून ठेवलेला आहे.

९. निविदाकारांनी सादर केलेली माहिती खोटी आढळल्यास सदर निविदाकारांस प्राधिकरणाच्या कोणत्याही निविदा भरण्यास / काम करण्यास बंदी करण्यात येईल. हे प्राधिकरण, निविदाकारांनी सादर केलेल्या कागद पत्रांची स्वतंत्रपणे खात्री करुन घेण्याचा अधिकार राखुन ठेवित आहे.

१०. सविस्तर माहितीसाठी, कृपया श्री. ए.के.पहल, अति. मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्रा (मो.क्र. ९९८७७८८३५२) यांच्याशी संपर्क साधावा.

**दिनांक** : १४/१२/२००९
**ठिकाण** : वांद्रे (पूर्व), मुंबई
क्र. अवि/स्कायवॉक/एमएमआर/२००९

**सही/-**
**(ए.के.पहल)**
अति. मुख्य अभियंता, अभि.विभाग